# उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.६, चैतन्यनगर, नांदेड ता. जि. नांदेड
## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

उमरी तालुक्यातील तमाम नागरीकांना याद्वारे कळविण्यात येते की, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.6, नांदेड यांच्या कार्यक्षेत्रातील **मौ. हस्सा ता. उमरी जि. नांदेड** या गांवाच्या शिवारातील खालील अनुसुचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे जमीन धारकांच्या जमीनी **निमटेक वितरीकेवरुन निघणा-या उजवी लघुवितरीका क्र. १ वरील डावी उपलघुवितरिका क्र ३** च्या कामासाठी आवश्यक आहेत.

सदर जमीनी महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण ०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ दि.१२/०५/२०१५ व दि.३०/०९/२०१५ व शासन निर्णय महसुल व वनविभाग एलक्युएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२ मंत्रालय, मुंबई ३२ दि. २५/०१/२०१५ अन्वये खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पासाठी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने घेण्याबाबतच्या तरतुदीनुसार खाजगी खरेदी व्यवहाराने सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादीत करणे प्रस्तावीत आहे.

खालील अनुसुचीमध्ये जमीन मालकाचे नाव, गट नं. व संपादन करावयाचे क्षेत्र प्रस्तावित आहे. संपादित क्षेत्र संयुक्त मोजणी अहवालानुसार विचारात घेण्यात आलेले आहे. सदर जमीनीबाबत जमीन मालकाच्या हिस्यावर हक्क, हितसंबंध, दत्तकपत्र, वारसाहक्क, गहाण, दान, बोजा, बाकी, लिज, कर्ज, बक्षिसपत्र, जप्ती, मदार व इतर हक्क असल्यास या अधिसुचनेच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत पुराव्यासह लेखी तक्रार कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ वाजे पर्यंत) समक्ष अथवा रजिस्टर्ड पोष्टाने या कार्यालयास (कार्यकारी अभियंता उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.६, नांदेड) देण्यात यावी. विहीत मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदरहू जमीन मालकांची मिळकत निर्वेध व निर्जोखीम असल्याचे समजुन कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.६, नांदेड हे वरील कालावधीच्या नंतर पुढील खरेदीचा व्यवहार केव्हाही करतील. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत असल्यास ती या कार्यालयास कायदेशीररीत्या बंधनकारक राहणार नाही. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

निमटेक वितरीकेवरुन निघणा-या उजवी लघुवितरीका क्र. १ वरील उपलघुवितरिका क्र.३ च्या कामासाठी प्रस्तावित भुधारकांच्या नांवे असलेल्या गट निहाय संपादित क्षेत्राचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | भुधारकाचे नांव | गट क्र. | संपादनाखालील क्षेत्र हे.आर |
|---|---|---|---|
| १ | कविता गिरीधर जाधव | ३७ पै. | ०.१३ |
| | | **एकुण क्षेत्र** | **०.१३** |
| | | | |

कार्यकारी अभियंता
उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र. ६,
नांदेड